**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री.तुषार देविदास झेंडे
मु.पो.म्हसोबाची वाडी, ता.इंदापूर,
जि.पुणे-४१३१०५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक व खाजगी सचिव,
सहकार आयुक्त कार्यालय, मध्यवर्ती इमारत,पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपसरव्यवस्थापक,
दि बारामती सहकारी बँक मर्यादित

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५९ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.तुषार देविदास झेंडे, मु.पो.म्हसोबाची वाडी, ता.इंदापूर, जि. पुणे-४१३१०५

**अपिलीय प्राधिकारी** यांचे प्रतिनिधी तथा उपनिबंधक व खाजगी सचिव,
सहकार आयुक्त कार्यालय, मध्यवर्ती इमारत,पुणे श्री.यशवंत परशुराम गिरी

**जन माहिती अधिकारी** तथा उपसरव्यवस्थापक, दि बारामती सहकारी बँक मर्यादित
श्री.राजेंद्र शिवाजीराव बनकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.१२.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.२.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

(१) कर्जावर व्याज आकारण्यात आलेल्या व्याजाचे दर व पध्दती

(२) कर्जावर व्याज आकारण्याची पध्दत कशी आहे. द.सा.द.शे / चक्रवाढ /सरळ /फ्लॅट रेट / रीड्युसिंग

(३) शिल्लक रकमेवर / मुदलावर व्याज आकारले जाते काय, ते कशाप्रकारे आहे उदाहरणासह स्पष्ट करावे.

(४) आपल्या बँकेत थकित कर्जाचे व्याज आकरणीची पध्दत कशी आहे, संदर्भासाठी एक उदाहरण द्यावे.

(५) थकित कर्जासाठी आकारण्यात येणारे दंडव्याज किती टक्के आहे आणि ती आकारण्याची पध्दत एक उदाहरणासह द्यावी

(६) थकित कर्जासाठी आकारण्यात येणारे इतर चार्जेस कोणते व किती, त्यांचे आकारणीची पध्दत एका उदाहरणासहीत स्पष्ट करावी.

## विवेचन

बँकेतून घेतलेल्या कर्जावरील व्याज आकारण्याच्या संदर्भात मागितलेली माहिती बँकेने नाकारल्यामुळे व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ते मान्य करुन अपील निकाली काढल्यामुळे अपीलकर्ता श्री.तुषार देविदास झेंडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. बारामती सहकारी बँक मर्यादित या बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही. या अधिनियमातील तरतुदीनुसार बँक सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही, अशी बँकेची भूमिका आहे. अपिलीय प्राधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी बँकेची ही भूमिका मान्य केली. राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ.सु.वि.जोशी यांनीही अन्य अपिलाच्या संदर्भात ही भूमिका मान्य करणारा निकाल दिला आहे. जन माहिती अधिकारी श्री.रविंद्र शिवाजीराव बनकर व अपिलीय प्राधिकाऱ्यांचे प्रतिनिधी श्री.यशवंत परशुराम गिरी यांनी

आयोगापुढील सुनावणीत हीच भूमिका मांडली. संबंधित बँकेला सहाय्यक उपनिबंधकाकडे नोंद करावी लागते, म्हणजेच त्यांच्यावर शासनाचे नियंत्रण असते, म्हणून त्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येतात व सार्वजनिक प्राधिकरण ठरतात, असे प्रतिपादन श्री.झेंडे यांनी केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि.१३.३.२००८**

**आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश निवृत्ती कांबळे
५४/बीपी/४४१, लोहियानगर, पुणे-४२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रमेश निवृत्ती कांबळे
५४/बीपी/४४१, लोहियानगर, पुणे-४२

**अपिलीय प्राधिकारी** तथा
प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे
श्री. चंद्रकांत माणिकराव सोनटक्के

**जन माहिती अधिकारी** तथा
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे
श्री. अमर आनंदराव पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ५.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | ५.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>१. परिवहन आयुक्त यांचे शिफारशीनुसार मॉडेल टाटा एलपीटी १६१३/४२ बाबतची तांत्रिक माहिती<br>२. मॉडेल टाटा एलपीटी १६१३/४२ ला मान्यता दिल्याची तारीख व क्रमांक<br>३. परिवहन कार्यालयाचे मान्यतेपूर्वीच काही वाहनांची नोंदणी झाली आहे का ? असल्यास त्याबाबतची दिनांकनिहाय माहिती<br>४. वाहनाचे परीक्षणानंतर मान्यता दिलेल्या वितरकांची (ओजन्सी) नावे<br>५. कार्यालयातील इनवर्ड (आवक) क्रमांकसह, प्राप्त वाहन प्रशिक्षण अहवाल | |

## विवेचन

टाटा एलपीटी १६१३/४२ या ट्रकच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री. रमेश निवृत्ती कांबळे यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपुरी माहिती दिल्याच्या कारणावरून श्री. कांबळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांचेकडे अपील केले. संबंधित ट्रकच्या मान्यतेच्या परिपत्रकाची छायांकित प्रत व दि. १.१.१९९७ पर्यंत मान्यतेविना असलेल्या २२ गाड्यांची माहिती देण्यात आली. परंतु दि. २७.६.१९९७ चे परिपत्रक मान्यतेचे समजल्यास दि. २७.६.१९९७ पर्यंत नोंद झालेल्या गाड्यांची माहिती मिळावी, अशी मागणी श्री. कांबळे यांनी केली. त्यानुसार माहिती देण्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी मान्य केले. ही माहिती देण्याचा आदेश देऊन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले. परंतु आपल्याला ही माहिती मिळालेली नाही. अपुरी माहिती मिळाली, या कारणावरून श्री. कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. कांबळे यांनी केलेल्या अर्जावर उपलब्ध माहिती विहित मुदतीत देण्यात आली व अन्य कार्यालयांकडे असलेली माहिती मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे श्री. अमर आनंदराव पाटील व अपिलीय

प्राधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे श्री. चंद्रकांत माणिकराव सोनटक्के यांनी नमूद केले. तशा स्वरूपाची कागदपत्रे त्यांनी सादर केली.

श्री. कांबळे हा विषय प्रादेशिक परिवहन कार्यालय, परिवहन आयुक्त, ए.आर.ए.आय. ही गाड्यांची तपासणी करुन प्रमाणपत्र देणारी संस्था इत्यादी विविध ठिकाणी मांडत आले आहेत. ए.आर.ए.आय. ही संस्था गाड्यांच्या मूळ सांगाड्याला (चॅसीला) मान्यता देते की वाहनांची पूर्ण रचना (बॉडी बिल्डिंग ) झाल्यानंतरही तपासणी करुन मान्यता देते, अशा स्वरूपाचे तांत्रिक मुद्दे श्री. कांबळे यांनी अर्जामध्ये व सुनावणीतही नमूद केले. अनुषंगिक नियमांची तपशीलवार माहिती त्यांना देण्यात आल्याचे व त्याअन्वये योग्य माहिती दिली गेली असल्याचे श्री. सोनटक्के यांनी सांगितले. या संदर्भातील नियमावलीतील तपशीलही त्यांनी स्पष्ट केला. मात्र श्री. कांबळे यांनी योग्य नियमानुसार योग्य कारवाई केली जात नसल्याचे प्रतिपादन केले.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांपुढील सुनावणीच्या वेळी नमूद केल्याप्रमाणे तांत्रिक माहितीचे परिपत्रक व दि. २७.६.१९९७ पर्यंत नोंद झालेल्या गाड्यांची माहिती आपल्याला दिली गेली नाही, असे श्री. कांबळे यांनी नमूद केले.

विहित मुदतीत माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे श्री. विकास ध. पांडकर यांनी खुलासा करावा, अशी सूचना विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. चंद्रकांत सोनटक्के यांच्यामार्फत आयोगाने दिली. त्यानुसार श्री. पांडकर यांनी दि. २५.२.२००८ रोजी आयोगापुढे उपस्थित राहून लेखी व तोंडी निवेदन सादर केले. श्री. कांबळे यांनी अर्ज सादर केल्यापासून त्यांना आवश्यक ती माहिती देण्यासाठी विविध कार्यालयांशी आपण केलेला पत्रव्यवहार व प्रयत्न याबाबतचा तपशील त्यांनी कागदपत्रांसह सादर केला. तसेच आपल्या कार्यालयाकडील उपलब्ध माहिती विहित मुदतीत दिली व अन्य कार्यालयांकडील (परिवहन आयुक्त, ए.आय. ए.आर., टेल्को कंपनी ) माहिती उपलब्ध झाली तसतशी ती श्री. कांबळे यांना पुरविली, असे त्यांनी सांगितले. संबंधित परिपत्रक श्री. कांबळे यांना देण्यात आले असून त्यात सर्व तांत्रिक माहिती आहे, असे त्यांनी नमूद केले.

श्री. रमेश कांबळे यांचा मूळ अर्ज दि. ३.३.२००६ रोजीचा आहे. श्री. पांडकर यांची दि. २९.६.२००६ रोजी पदोन्नतीने बदली झाली व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. एन.बी. बिलावर

नऊ महिन्यांपूर्वी सेवानिवृत्त झाले, असे जन माहिती अधिकारी श्री. अमर आनंदराव पाटील यांनी सांगितले.

श्री. पांडकर यांनी माहिती मिळवून देण्याचा प्रयत्न केला असला तरी दि. २७.६.१९९७ पर्यंतच्या नोंद झालेल्या सर्व गाड्यांची माहिती आपल्याला देण्यात आली नाही, असे प्रतिपादन श्री. कांबळे यांनी केले.

नियमावलीतील तरतुदींचा अन्वयार्थ वा त्यानुसार कार्यवाही याबाबत उभय बांजूमध्ये असलेले मतभेद हा या विषयातील मुख्य भाग आहे. गाड्यांना मान्यता देण्याच्या नियमांनुसार केलेली कार्यवाही योग्य की अयोग्य, हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही. जन माहिती अधिकाऱ्यांनी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी श्री. कांबळे यांच्या अर्जाची योग्य ती दखल घेऊन माहिती मिळवून देण्याचा प्रयत्न केला असल्याचे निवेदनावरुन व कागदपत्रांवरून स्पष्ट होते.

संबंधित नियमांची छायाप्रत, दि. २७.७.१९९७ पर्यंतच्या संबंधित गाड्यांच्या मान्यतेबाबतची स्थिती याची माहिती श्री. कांबळे यांना पूर्ण मिळाली नसल्याचे त्यांच्या निवेदनातून स्पष्ट होते. ही माहिती त्यांना दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य.

२. अपीलकर्त्यास अपेक्षित असलेला दि. २७.७.१९९७ पर्यंतच्या गाड्यांच्या मान्यतेबाबतचा तपशील, तसेच नियमावलीची प्रत अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी दि. २०.३.२००८ पर्यंत नि:शुल्क द्यावी. त्याचा पूर्तता अहवाल दि. २५.३.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ, पुणे

पुणे
दि. ७.३.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रमेश निवृत्ती कांबळे
५४/बीपी/४४१, लोहियानगर, पुणे-४२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०.२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रमेश निवृत्ती कांबळे
५४/बीपी/४४१, लोहियानगर, पुणे-४२

**अपिलीय प्राधिकारी** तथा
प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे
श्री. चंद्रकांत माणिकराव सोनटक्के

**जन माहिती अधिकारी** तथा
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे
श्री. अमर आनंदराव पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ३.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | ५.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १६.६.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>दि. ७.२.२००६ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही केली, केली नसल्यास का केली नाही, व केव्हा करणार | |

## विवेचन

सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. श्याम लोही यांच्याविरुध्द तत्कालीन प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. एन. बी. बिलावर यांच्याकडे केलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. रमेश निवृत्ती कांबळे यांनी मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी त्याबाबत कोणतेही उत्तर दिले नाही व अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी श्री. कांबळे यांचे अपील फेटाळले. अधिकाऱ्यांविरुध्दचा तक्रार अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही, तसेच कार्यवाही का केली नाही, केव्हा कार्यवाही करणार, ही विचारणाही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही, असे नमूद करून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील फेटाळले. त्याविरूध्द श्री. कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. कांबळे यांचा ट्रक कर भरणा न केल्यामुळे वायुवेग पथकाने अटकावून ठेवला होता. त्यानंतर श्री. कांबळे यांनी थकित कर भरला, परंतु कागदपत्रे सादर न केल्यामुळे श्री. लोही यांनी ट्रक सोडण्यास नकार दिला. त्या संदर्भातील हा विषय आहे. ट्रकची कागदपत्रे आपल्याकडे नाहीत, ट्रकची नोंदणी प्रादेशिक परिवहन कार्यालयात झाली असल्यामुळे संबंधित कागदपत्रे संगणकावर बघून घेऊन गाडी सोडण्याची आपली विनंती श्री. लोही यांनी मान्य केली नाही. त्यानंतर तत्कालीन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. विकास ध. पांडकर यांच्याशी आपण संपर्क साधला व त्यांनी आपला ट्रक

सोडला. श्री. लोही यांनी अडवणूक करून मानसिक त्रास दिला, आदी कारणांवरुन त्यांच्या विरुध्दचा तक्रार अर्ज आपण श्री. एन. बी. बिलावर यांना सादर केला, असे श्री. कांबळे यांनी नमूद केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. विकास ध. पांडकर यांनी माहिती मागणीच्या अर्जाला उत्तर न दिल्यामुळे खुलासा करावा, अशी सूचना आयोगाने विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. चंद्रकांत माणिकराव सोनटक्के यांच्याद्वारे दिली होती. त्यांनुसार श्री. पांडकर यांनी दि. २५.२.२००८ रोजी आयोगापुढे उपस्थित राहून तोंडी व लेखी निवेदन सादर केले. श्री. कांबळे यांचे वाहन सोडून देऊन आपण त्यांना मदतच केली, वाहन मुक्त करण्याचा आदेश मी दिला होता. त्यामुळे श्री. लोही यांच्या तक्रारीची दखल घेण्याची राहून गेली व कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे कळविण्याचे अनवधानाने राहून गेले. मदत करण्याच्या सद्हेतूने आपण कृती केलेली असल्यामुळे माहिती न देण्याचा कोणताही उद्देश नव्हता, असे श्री. पांडकर यांनी नमूद केले. माहिती अधिकाऱ्यांनी तक्रार अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती आपल्याला दिली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील फेटाळले, असे श्री. कांबळे यांनी नमूद केले.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात आल्यानंतरच्या प्रारंभीच्या काळातील हा अर्ज आहे. या पार्श्वभूमीवर श्री. पांडकर यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. कार्यवाही का केली नाही, केव्हा करणार, अशा स्वरूपाची खुलासेवजा व गृहितावर आधारित विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नसल्याचा अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. चंद्रकांत माणिकराव सोनटक्के यांचा निर्णय योग्य आहे.

आयोगाचा निर्णय पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंठपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ७.३.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री.दत्तात्रय मारुती तारु
रा.१३२३, कसबा पेठ, पुणे ४११ ०११ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ढोलेपाटील रोड, पुणे -१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सरपंच तथा मुख्य विश्वस्त,
श्री समस्त भोईपंच मंडळी, कसबा, पुणे ११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४ व ३२५/ पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय मारुती तारु
रा.१३२३, कसबा पेठ, पुणे ४११ ०११

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>**अपील क्र.१४/३२५**<br><br>श्री समस्त भोई पंचमंडळी, कसबा पेठ, पुणे ११ , (रजि.नं.ए-४६७) या संस्थेची गेल्या ३० वर्षात झालेल्या विश्वस्तांच्या निवडणूकीचा तपशील व वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताची प्रत, तसेच ताळेबद/जमाखर्च/तेरीज यांच्या गेल्या १० वर्षातील प्रती तसेच इतर कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती. |

## विवेचन

श्री समस्त भोई पंचमंडळी, कसबा पेठ,पुणे या सार्वजनिक विश्वस्त संस्थेची गेल्या ३० वर्षांमधील निवडणूक, वार्षिक सर्वसाधारण सभा, जमाखर्च इ. माहिती अपीलकर्ता श्री.दत्तात्रय मारुती तारु यांनी सस्थेचे मुख्य विश्वस्त श्री.रघुनाथ शंकर भोकरे यांच्याकडे मागितली होती. मूळ अर्जाचे टपालच श्री.भोकरे यांनी स्वीकारले नाही, म्हणून श्री.तारु यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपिलाची दखल न घेतल्यामुळे श्री.तारु यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

न्यायिक चौकशीच्या व स्वतंत्र नोंदणीच्या कामामध्ये व्यस्त असल्यामुळे उपस्थित राहू शकत नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री.ए.एच.शिंगणे यांनी आयोगाला कळविले. श्री.भोकरे हेही उपस्थित नव्हते. या विषयासंबंधित अपिलाच्या संदर्भात दि.१८.४.२००७ रोजी समक्ष हजर राहून श्री.भोकरे यांनी सादर केलेल्या निवेदनानुसार मुख्य विश्वस्त पदाचा राजीनामा दिला असल्याचे आयोगाला त्यांनी कळविले होते. आपला राजीनामा दि.९.१०.२००५ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आलेला असून दि.६.३.२००६ रोजी आपण संपूर्ण कारभार अध्यक्ष व सरचिटणीस कार्यकारी मंडळ, कसबा पेठ, पुणे-१८ यांच्याकडे हस्तांतरित करीत असल्याचे दि.५.३.२००६ च्या पत्रात श्री.भोकरे यांनी नमूद केले आहे.

त्याची प्रत त्यांनी आयोगाला सादर केली. श्री.भोकरे यांनी राजीनामा दिला हे खरे नाही, अद्याप त्यांच्याकडेच सूत्रे आहेत, असे प्रतिपादन श्री.तारु यांनी केले. परंतु हे सप्रमाण सिध्द करणारे पुरावे त्यांनी दिले नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी नेमके कोण, हे निश्चित होऊ शकत नाही. संस्थांतर्गत वादातून धर्मादाय आयुक्तांपुढे विषय दाखल आहे, हे लक्षात घेता त्याबाबतचा निर्णय झाल्याशिवाय याबाबतचे चित्र स्पष्ट होणार नाही.

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ, पुणे

पुणे
दि.१३.३.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. बाळासाहेब तुळशिराम आंधळे
सुखकर्ता, अ-१०, माणिक चौक, राजगुरुनगर, अपीलकर्ता
ता. खेड, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
सचीव, आदिवासी शिक्षण संस्था, जुन्नर,
ता. जुन्नर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९.१०.२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. बाळासाहेब तुळशिराम आंधळे
सुखकर्ता, अ-१०, माणिक चौक,
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
आदिवासी शिक्षण संस्था, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे
श्री. देवराम सावळेराम मुंढे

ॲड. श्री. एस. डी. पंचपोर उत्तरवादीतर्फे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.३.२००६ |

८ मुळ अर्जात मागणी केलेली माहिती

१. आदिवासी शिक्षण संस्था जुन्नर रजि. नं.एफ ४२० या संस्थेच्या सन २००१-२००२, २००२-२००३, २००३-०४, २००४-०५, २००५-०६ या प्रत्येक वर्षीच्या संस्थेच्या सभासदांची यादी, पूर्ण नाव, पत्ता, वय, व्यवसायासह

२. आदिवासी शिक्षण संस्था, जुन्नर संचलित सर्व

अ. माध्यमिक विद्यालये

ब. अनुदानित आश्रमशाळा, पोस्ट बेसिक आश्रमशाळा, तळेराव व चांवड, जुन्नर - कर्मचा-यांची सेवाज्येष्ठता यादी सन २०००-२००१ ते २००५-०६ अखेर

क. माध्यमिक अनुदानित विद्यालयातील मुख्याध्यापकांचा रोस्टर सन २०००-०१ ते २००५-०६ अखेर

ड. अनुदानित आश्रमशाळा, चावंड (प्राथमिक), पोस्ट बेसिक, चावड व अनुदानित आश्रमशाळा, तळेराव (प्राथमिक), पोस्ट बेसिक (माध्यमिक), तळेराव यांचा कर्मचारी रोस्टर सन २०००-२००१ ते २००५-०६ अखेर, तसेच सन २०००-२००१ ते २००५-०६ अखेर प्राप्त झालेले अनुदान

३. आदिवासी शिक्षण संस्था, जुन्नर चालवीत असलेल्या सात वसतिगृहांची स्थिती, विद्यार्थी संख्या पट, विद्यार्थी वसतिगृहातील कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता यादी सन २०००-०१ ते २००५-०६

४. समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या सात वसतिगृहांचे वार्षिक अनुदान, सात वसतिगृहांपैकी किती वसतिगृहांवर कारवाई करण्यात आली त्याचा तपशील सन २०००-२००१ ते २००५-०६ अखेर

५. संस्थांतर्गत मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संवर्गनिहाय माहिती

६. श्री. दादाभाऊ उमाजी बगाड व शिवरात तानाजी बगाड हे सन २००५-०६ साठी संस्थेचे सभासद आहेत काय, नसल्यास केव्हापासून नाहीत, व त्यांचे सभासदत्व रद्द होण्याचे कारण

७. संस्थेच्या कार्यकारिणीचा सध्याचा कार्यकाल तीन वर्षांचा आहे की पाच वर्षांचा त्याची माहिती

## विवेचन

आदिवासी शिक्षण संस्था जुन्नर, जि. पुणे यांच्या माध्यमिक विद्यालये, आश्रमशाळा प्राथमिक/माध्यमिक, अनुदानित वसतिगृहे इत्यादींबाबतची सविस्तर माहिती अपीलकर्ता श्री. बाळासाहेब तुळशिराम आंधळे, अध्यक्ष; आदिवासी शिक्षण संस्था सेवक संघ, सुखकर्ता, अ-१०, माणिक चौक, राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे यांनी जन माहिती अधिकारी तथा सचीव, आदिवासी शिक्षण संस्था, जुन्नर यांच्याकडे मागितली होती. इ.सन १९९४ ते २००५ या काळातील ही माहिती असून काही सभासदांच्या स्थानापासून कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठता यादीपर्यंत विविध मुद्दयांचा त्यात समावेश आहे. श्री. आंधळे यांनी संपर्क साधला नाही, म्हणून स्मरणपत्र पाठविले. परंतु २००३ सालापासून आपण माहिती मागत असून कोणतीही माहिती दिली जात नसल्याच्या कारणावरून श्री. आंधळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सह धर्मादाय आयुक्त, पुणे यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील मान्य करुन एक महिन्याच्या आत निःशुल्क माहिती देण्याचा आदेश जन माहिती अधिकाऱ्यांना दिला. तरीही माहिती मिळाली नाही, म्हणून श्री. आंधळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आदिवासी शिक्षण संस्थेत भ्रष्टाचार व गैरकारभार होत असल्याचा श्री. आंधळे यांचा आरोप असून शिक्षण खात्यातील वरिष्ठांपासून राज्य मुख्य माहिती आयुक्तांपर्यंत विविध पातळ्यांवर अर्ज, अपिले, तक्रारी आदींद्वारे ते सातत्याने हा विषय मांडत आहेत, तसेच व्यापक प्रमाणावर माहितीच्या मागणीचे अर्ज करीत आहेत. संस्थेतील गैरकारभारातील सर्व पुरावे आपण मागणी केलेल्या कागदपत्रांमध्ये सापडण्याची शक्यता आहे व त्यामुळे संस्थेला मिळणाऱ्या अनुदानातील मोठा भ्रष्टाचार उघडकीस येईल, या भीतीपोटीच सचीव आपल्याला माहिती देण्याचे टाळत आहेत, असे श्री. आंधळे यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. चार अर्जात मागणी केलेली माहिती न मिळाल्यामुळे प्रत्येकी रुपये २५,०००/- प्रमाणे एक लाख रुपये शास्ती व आपल्याला झालेल्या आर्थिक, मानसिक आदी त्रासाबाबत प्रत्येक अर्जास ११०००/- रुपयांप्रमाणे एकूण ४४,०००/- रुपये नुकसान भरपाई मिळावी. संस्थेला शासनाकडून दिली जाणारी वेतनेतर अनुदाने बंद करण्याचे आदेश द्यावेत, इत्यादी मागण्या श्री. आंधळे यांनी लेखी व तोंडी केल्या. माहितीसाठीचे शुल्क म्हणून आपल्याला रु. ८६,०००/- भरण्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी सांगितले, असेही त्यांनी सांगितले.

श्री. आंधळे हे आदिवासी शिक्षण संस्थेत सह-शिक्षक आहेत. संस्थेबद्दल जाणीवपूर्वक, बदनामीकारक कारवाया व अर्ज / अपिले आदी ते करीत असतात. स्वतःच्या पत्नीला कायम स्वरुपी नोकरीस लावावे त्यासाठी ते माहितीच्या अधिकाराचा दुरुपयोग करीत आहेत. श्री. आंधळे व त्यांचे काही सहकारी शिक्षक 'आदिवासी शिक्षण संस्था सेवक संघ' ही संस्था स्थापन करुन संस्थेला सातत्याने त्रास देत आहेत. त्यातील अध्यापनात कार्यक्षम नसलेल्या शिक्षकांवर संस्थेने कारवाई केली आहे, त्यामुळे ते असा त्रास देऊन दबावाचे राजकारण करीत आहेत, असे प्रतिपादन संस्थेचे सचिव श्री. देवराम सावळेराम मुंढे व संस्थेचे प्रतिनिधी ॲड. एस. डी. पंचपोर यांनी केले. आवश्यक असलेल्या माहितीबाबतच्या कागदपत्रांचे अवलोकन करावे व योग्य ते शुल्क शाळेच्या बँक खात्यात भरावे, असे संस्थेच्या सचिवांनी श्री. आंधळे यांना कळविले, त्यांनी शुल्क भरले नाही. माहिती मागणीसाठी रु. ८६०००/- शुल्क कळविल्याचे नमूद करुन ते दिशाभूल करीत आहेत. श्री. आंधळे यांच्या प्रमाणेच श्री. नामदेव भिकाजी सोनवणे, श्री. देवराम सखाराम पोटकुले व श्री. राजेंद्र भिकाजी कांबळे या अन्य तीन शिक्षकांनी माहिती मागितली होती. चौघांना मिळून कळविलेली ही शुल्काची रक्कम आहे, असेही ॲड पंचपोर यांनी नमूद केले. श्री. आंधळे वगळता इतर तिघांनी पूर्ण माहिती मिळाली असल्याचे संस्थेला लेखी दिले आहे, असे निवेदन त्यांनी केले व तिघांची तशी पत्रे सादर केली. तीनही पत्रे एकाच स्वरुपाची, बव्हंशी सारख्याच मजकुराची आहेत. तसेच आयोगापुढील सुनावणीनंतरच्या दि. ११.१०.२००७ या तारखेची आहेत. श्री. आंधळे यांनी स्वतःवरील आरोपांचा इन्कार केला.

संस्थेला शासनाच्या तीन विभागांकडून अनुदान मिळते. उसनवार म्हणून मुख्याध्यापकांनी संस्थेकडून रक्कम घेतल्याचे दाखविले जाते, वेतनेतर अनुदान प्राप्त झाल्यावर मुख्याध्यापक व संस्थाचालक ती रक्कम काढून घेतात, त्यात अपहार केला जातो. त्यामुळे प्रत्यक्ष खर्चाला संस्थेकडे पैसे असत नाहीत व विद्यार्थ्यांकडून वेगवेगळे शुल्क नियमबाह्य घेतले जाते. या साऱ्याचा विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्यावर व एकूण शैक्षणिक वातावरणावर प्रतिकूल परिणाम होतो, असे प्रतिपादन श्री. आंधळे यांनी केले. गैरव्यवहार असल्यामुळेच शिक्षण संचालक कार्यालयाने प्रशासक नियुक्ती-सारख्या शिफारशीची कारवाई संस्थेवर पूर्वीही केली आहे, असे श्री. आंधळे यांनी नमूद केले. अनुषंगिक कागदपत्रे त्यांनी सादर केली. संस्थेचे प्रतिनिधी ॲड. पंचपोर यांनी त्याचा इन्कार केला.

सी.ए. मार्फत लेखापरीक्षण करून शिक्षणाधिकारी, धर्मादाय आयुक्त आदींकडे दरवर्षी अहवाल सादर केला जातो, तसेच शिक्षणाधिकारी कार्यालयाचे विशेष पथकही आकस्मितपणे हिशेब तपासणी करते. या साऱ्या अनियमितता होत नसतीलच असे नाही, परंतु बेकायदेशीर कोणतीही गोष्ट केली जात नाही, असे प्रतिपादन ॲड. पंचपोर यांनी केले.

आपण अनेक अर्ज / अपिले केली, परंतु सह धर्मादाय आयुक्त, राज्य माहिती आयुक्त आदींच्या आदेशानंतरसुध्दा एकातही माहिती मिळाली नाही, असे श्री. आंधळे यांनी सांगितले. मात्र यापूर्वी त्यांना सातत्याने माहिती देण्यात आली आहे, असे नमूद करुन श्री. देवराम सावळेराम मुंढे व ॲड. श्री. पंचपोर यांनी त्याबाबतचा तपशील सादर केला. परंतु मिळालेली माहिती पूर्ण नाही, असा आक्षेप श्री. आंधळे यांनी नोंदविला. नेमकी कोणती माहिती मिळाली नाही, ते श्री. आंधळे यांनी स्पष्ट करावे. कोणतीही माहिती देण्यास संस्था तयार असल्याचे संस्थेने यापूर्वीही सर्व पातळ्यांवरील अधिकाऱ्यांना कळविले असून आजही तीच भूमिका कायम आहे. मात्र पुनःपुन्हा तीच माहिती संस्थेकडे व अन्य विभागाकडे मागणे हा त्रास देण्याचा प्रकार आहे, असे प्रतिपादन श्री. मुंढे व ॲड. श्री. पंचपोर यांनी केले.

उभय बाजूंची सविस्तर निवेदने व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता पुढील बाबी स्पष्ट होतात :

१. श्री. आंधळे व संस्थाचालक यांच्यात मतभेद असून माहितीच्या व्यापक मागणीचे व संस्थेसंदर्भातील तक्रारींचे अर्ज विविध पातळ्यांवर श्री. आंधळे व त्यांचे सहकारी करीत आले आहेत.

२. संस्थेने काही माहिती दिली आहे, परंतु पूर्ण माहिती मिळाली नसल्याचा श्री. आंधळे यांचा प्रत्येक अर्जाबाबत आक्षेप आहे. नेमकी कोणती माहिती मिळाली नाही, हे श्री. आंधळे यांनी स्पष्ट केलेले नाही. तीच तीच माहिती पुनःपुन्हा मागण्याला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये प्रतिबंध केलेला नाही, हे श्री. आंधळे यांचे प्रतिपादन तांत्रिकदृष्ट्या रास्त असले तरी कायद्याचा मूळ उद्देश व तत्त्व यांच्याशी ते सुसंगत नाही.

३. संस्थेने शुल्काबाबतचा तपशील नेमकेपणाने कळविलेला नाही. ढोबळ मानाने शुल्क कळविले आहे व सकृत्दर्शनी ते अवाजवी वाटते. कळविलेले शुल्क श्री. आंधळे यांनी भरलेले नाही.

४. दंडात्मक कारवाई व नुकसान भरपाईबाबत श्री. आंधळे यांनी केलेली मागणी वाजवी नाही.

माहितीच्या अधिकाराबाबत उभय बाजू अविवेकी भूमिका घेत आहेत, असे एकूण संदर्भावरुन स्पष्ट होते.

वरील बाबी लक्षात घेता श्री. आंधळे यांनी मूळ अर्जानुसार जी माहिती मिळालेली नाही, तेवढाच तपशील संस्थेला व आयोगाला सादर करावा. शुल्काबाबतचे स्पष्टीकरण संस्थेने तीन दिवसात द्यावे, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानंतर श्री. आंधळे यांनी दिलेले निवेदन आधीच्याच मुद्दयांचा पुनरूच्चार असून नेमकी कोणती माहिती मिळावयाची राहिली आहे याचा नेमका तपशील दिलेला नाही. संस्थेचे सचीव श्री. देवराम सावळेराम मुंढे यांनी सादर केलेल्या निवेदनातही असाच पुनरूच्चार आहे. शुल्काबाबतचे स्पष्टीकरण व दिलेल्या माहितीबाबतचा नेमका तपशील त्यात नाही. माहितीच्या अधिकारापेक्षा परस्परांमधील वादाचा उभय बाजूंच्या भूमिकेतील प्रभावच त्यातून स्पष्ट होतो.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. मूळ अर्जात मागितलेली व न मिळालेली माहिती नेमकी कोणती याचा तपशील अपीलकर्ता श्री. बाळासाहेब तुळशिराम आंधळे यांनी संस्थेला सादर करून त्याची प्रत आयोगाला पाठवावी. त्यांचे पत्र मिळाल्यापासून पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी तथा संस्थेचे सचीव श्री. देवराम सावळेराम मुंढे यांनी संपूर्ण माहिती श्री. आंधळे यांना निःशुल्क द्यावी व तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १७.३.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४ / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. माधव गंगाधर अभ्यंकर<br>५४, नीळकंठ, तुळशीबागवाले कॉलनी, सहकार नगर, पुणे-३७ |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, बिबवेवाडी, आदर्शनगर, पुणे-३७ |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, बिबवेवाडी, आदर्शनगर, पुणे-३७ |

अपीलकर्ता गैरहजर. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांनी मागितलेली माहिती यापूर्वीच दिल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३१.३.२००८**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६५ / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. कांताराम तात्याबा काळे<br>मु. पो. घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे-४१२ ४०८ |
| ३ | जन माहिती अधिकारी | ग्रामसेवक, ग्रामपंचायत काळेवाडी, दरेकरवाडी ग्रुप, पो.घोडेगाव, ता. आंबेगाव, जि. पुणे |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आंबेगाव, जि. पुणे |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत झाले. अंशतः माहिती देण्यात आली आहे. उर्वरित माहिती दि. २८.३.२००८ पर्यंत देण्याबाबत उभय बाजूंचे एकमत झाले. अनधिकृत नळजोडणीबाबत ग्रामपंचायतीमार्फत पाहणी करण्याचे आदेश देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, आंबेगाव, यांनी मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** 31 **.३.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र खंडपीठ, पुणे

क्र रा.मा.आ./~~आ.क्र.२२९४~~/ /२००८
राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र खंडपीठ ,
पुणे नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे १.
दुरध्वनी : २६०५०६३२-३३/२६०५०५८०
फॅक्स क्रमांक : २६०५०६३२
दिनांक :- २१ / ०३/२००८

प्रति,

श्री. अच्युत कृष्ण जातेगांवकर
मु.पो. जातेगांव खुर्द, ता.शिरूर जि.पुणे .

विषय : माहितीचे अधिकार अधिनियम २००५ अन्वये द्वितीय अपील
संदर्भ - आपले दि. १९/०३/२००८ चे अपील

महोदय,

आपले विषयाधीन द्वितीय अपीलाची तपासणी केली असता प्रस्तुत अपीलांचा विषय माहिती अधिकार आधिनियमातंर्गत येत नसल्याने आपले अपील निकाली काढण्यात येत आहे, असे आपणास कळविण्याचे मला मा.राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ यांच निर्देश आहेत.

आपला

(रा.म.गेंगजे)
कक्षअधिकारी
राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र खंडपीठ पुणे

२७/३/०८

प्रती,

१) प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे.
२) जन माहिती अधिकारी, पुनर्वसन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे-१ यांना माहितीस्तवअग्रेषित